**संचालक फलोत्पादन**
(कृषि आयुक्तालय)
कृषि भवन जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
दुरध्वनी क्र. ०२०-२५५३८०९५/२५५३७९५७ ई-मेल- hortplantprotection@rediffmail.com
**फॅक्स नं. ०२०-२५५३७५६५**

**पत्र**

जा.क्र.कृआ/फलो-३/आदि. परसबाग/१६-१७/मा.सु./ 4340 /१६
कृषि आयुक्तालय, (फलोत्पादन विभाग) महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११००५ दिनांकः- ~~२७/०९/२०१६~~ 30/9/2016

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक**
ठाणे/ पुणे /नाशिक /लातूर/अमरावती / नागपूर

**विषय :- आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाड व भाजीपाला लागवडीची योजना सन २०१६-१७**

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र.आपयो-२०१६/प्र.क्र.७९/९अे, दिनांक :- २६/०९/२०१६

सन २०१६-१७ मध्ये आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकांची लागवड योजना राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना व जिल्हानिहाय भौतिक आणि आर्थिक उद्दिष्ट सोबत सहपत्रित करण्यात येत आहेत. त्यानुसार योजना प्रभावीपणे व यशस्वीरित्या राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. भविष्यकाळात सोबत सहपत्रित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये काही बदल झाल्यास त्याप्रमाणे आपणास कळविण्यात येईल.

**सोबत-** १. शासन निर्णय
२. मार्गदर्शक सूचना

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११ ००५

**प्रत,**

१) **मा. अप्पर मुख्य सचिव (कृषि व फलोत्पादन),** कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२) **कृषि सहसंचालक (नियोजन),** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांना माहितीस्तव अग्रेषित.
३) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,** ठाणे/पालघर/ पुणे/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहमदनगर/ नांदेड/ यवतमाळ/ गडचिरोली/ चंद्रपूर/ अमरावती यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाड व भाजीपाला लागवडीची योजना
## सन २०१६-१७
## मार्गदर्शक सुचना

### १. प्रस्तावना

राज्यातील १३ जिल्हयांतील आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पौष्टीक आहार निर्माण करण्यासाठी आदिवासी कुटुंबाच्या घराभोवती असलेल्या परस बागेत विशिष्ट भाजीपाला व फळांची निवड करुन लागवड करण्यास प्रोत्साहन देण्याची फळझाडे व भाजीपाला पिकाची योजना राज्यात सन २००३-०४ पासून राबविण्यात येत आहे.

राज्यात आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याने त्याचे आहारात जीवनसत्व व इतर आवश्यक पोषक द्रव्ये उपलब्ध होण्याच्या हेतूने या कुपोषित भागासाठी पौष्टीक आहार योजना तयार करण्यात आली आहे. परसबागेत उपयुक्त फळे व भाजीपाल्याचा समावेश करुन आहार अन्नद्रव्याच्या दृष्टीने परिपुर्ण करता येणे शक्य होईल यास्तव राज्यातील १३ जिल्हयांतील आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पौष्टीक आहार निर्माण करण्यासाठी आदिवासी कुटुंबाच्या घराभोवती असलेल्या परसबागेत विशिष्ट भाजीपाला व फळांची निवड करुन लागवड करण्यास प्रोत्साहन देण्याची फळझाडे व भाजीपाला पिकाची योजना राबवावयाची आहे. त्यासाठी रुपये २०.०० लाखाची (रक्कम रुपये वीस लाख फक्त) रक्कम तरतूद मंजूर केलेली आहे. ही योजना राज्यातील ठाणे, पालघर पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, अहमदनगर, नांदेड, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर व अमरावती या जिल्हयांत राबवावयाची आहे त्याप्रमाणे योजना राबविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

### २. उद्दिष्ट

यावर्षी सन २०१६-१७ मध्ये ८,००० हजार लाभार्थ्यांच्या परसबागेत फळझाड व भाजीपाला पिकांची लागवड करण्याचे उद्दिष्ट आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी फळझाडे व भाजीपाल्याची कलमे/ रोपे ही शासकिय रोपवाटिका, कृषि विद्यापीठ रोपवाटिका अथवा नोंदणीकृत खाजगी रोपवाटीकांमधून पुरविण्यात यावीत. तसेच बियाणे, शासकीय रोपवाटिका, कृषि विद्यापीठ, राष्ट्रीय बिज निगम, राज्य बियाणे महामंडळ यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात यावीत व अवजारांमध्ये फावडे, टिकाव किंवा कुदळ व फावडे एकत्रित असलेले अवजार इत्यादींचा समावेश राहील. यापैकी किंमतीत बसणारे अवजारे महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करुन पुरवठा करण्यात यावा. लाभार्थीकडे स्वतःची अवजारे असल्यास त्यास अवजाराऐवजी कलमे/ रोपे तसेच बी-बियाणाचा पुरवठा एकूण रु. २५०/- तरतुदीच्या मर्यादेत आणि त्याचे परसबागेत लागवड योग्य असलेल्या क्षेत्राच्या मर्यादेच्या अधीन राहून देण्यात यावा.

३. **लाभार्थी निवड-**

आदिवासी क्षेत्रातील ज्या कुपोषणग्रस्त गांवामधील आदिवासी कुटुंबाकडे शेतजमीन किंवा परसबाग उपलब्ध असेल अशा आदिवासी लाभार्थीची सन २०१६-१७ या वर्षी आदिवासी कुटुंबाची निवड करण्यात यावी. राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशनच्या बैठकातील निर्णयांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने लाभार्थी निवड करतांना ज्या आदिवासी कुटुंबात कुपोषीत बालके असतील अशा आदिवासी शेतक-यांना या योजनेचा प्राधान्याने लाभ देण्यात यावा, मात्र यापूर्वी लाभ घेतलेल्या लाभधारकांना या योजनेचा पुन्हा लाभ देण्यात येऊ नये.

आदिवासी कुटुंबामध्ये कुपोषणाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर असल्याने विशेष बाब म्हणून ज्या जिल्ह्यातील सर्व आदिवासी शेतकऱ्यांना या योजनेचा यापुर्वी लाभ दिलेला आहे, अशा जिल्ह्यांमध्ये ज्या आदिवासी शेतकऱ्यांनी या योजनेमध्ये पुर्वी लाभ घेतलेला आहे त्यांना चक्रीय पध्दतीने किमान ५ वर्षाचे कालावधीनंतर पुनश्चः लाभ देण्यात यावा .

४. **कार्यक्रमांतर्गत लावावयाची फळझाडे / भाजीपाला -**

या कार्यक्रमांतर्गत १) चिकू २) कागदी लिंबू ३) पेरु ४) पपई ५) शेवगा ६) कढीपत्ता ७) आळू ८) मेथी ९) लाल भोपळा १०) पालक ११) दुधी भोपळा १२) मागणीनुसार इतर भाजीपाला जसे दोडका, गवार, वांगी व इतर या पैकी फळझाडे यांची कलमे/रोपे तसेच भाजीपाला रोपे / बियाणे याचा पुरवठा करण्यात यावा.

५. **लाभ द्यावयाचे साहित्य व सामुग्री पुरवठा -**

लाभार्थीकडे स्वतःची अवजारे नसल्यास प्रती लाभार्थी रु. १५०/- किंमतीची फळझाडे/भाजीपाला लागवड साहित्य पुरवठा व रु. १००/- किंमतीचे अवजारांचा संच पुरविण्यात यावा. लाभार्थीकडे स्वतःची अवजारे असल्यास त्यास अवजाराऐवजी कलमे/ रोपे तसेच बी-बियाणाचा पुरवठा एकूण रु. २५०/- तरतुदीच्या मर्यादेत आणि त्याचे परसबागेतील लागवड योग्य असलेल्या क्षेत्राच्या मर्यादेच्या अधिन राहून देण्यात यावा.

६. **अंमलबजावणी करणारी यंत्रणा-**

सदर कार्यक्रम संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत राबविण्यात यावा.

७. **लाभार्थी प्रशिक्षण -**

रोपांची लागवड, जोपासना, फळे काढणी व भाजीपाला यांचे खाद्यपदार्थ तयार करणे इत्यादीबाबत प्रशिक्षण ग्रामस्तरावर देण्यात यावे. प्रशिक्षणासाठी होणारा खर्च आत्मा मधुन करण्यात यावा.

८. **सनियंत्रण व आढावा -**

सबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी या योजनेचा गांवनिहाय आढावा घेऊन लागवडी संबंधीचा अहवाल व योजनेचा प्रगती अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांचेमार्फत संचालक (फलोत्पादन) यांना सादर करावा.

९. **योजनेअंतर्गत तपासणी-**

या योजनेतंर्गत लागवड केलेल्या परसबागेतील लागवडीची तपासणी खालील प्रमाणे मापदंडानुसार करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय कृषि सहसंचालक | ०.५ टक्के |
| २) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ टक्के |
| ३) | उपविभागीय कृषि अधिकारी | २ टक्के |
| ४) | तालुका कृषि अधिकारी | ५ टक्के |
| ५) | मंडल कृषि अधिकारी | २५ टक्के |
| ६) | कृषि पर्यवेक्षक | १०० टक्के |

१०. **मुल्यमापन-**

या योजनेचे मुल्यमापन दरवर्षीप्रमाणे करण्यात येऊन त्याबाबतचा मुल्यमापन अहवाल खालील प्रमाणे विहित तक्ता क्र-१ ते ४ मध्ये पाठविण्यात यावा.

**तक्ता क्रमांक-१**

| | | |
|---|---|---|
| १ | लाभार्थीचे नांव | |
| २ | गावाचे नांव | |
| ३ | तालुका | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | लाभार्थीचे वर्गीकरण | आदिवासी / बिगर आदिवासी |

**तक्ता क्रमांक-२**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | योजनेत सहभागी झाल्याचे वर्ष | | | | |
| २ | योजनेअंतर्गत फळझाडे/ भाजीपाला यापैकी कशाचा समावेश होता (नांवे व संख्या द्यावी) | **फळझाडे** | | **भाजीपाला** | |
| ३ | योजनेअंतर्गत लाभार्थीस प्राप्त कलमा / रोपांची फळपिक निहाय संख्या व भाजीपाला बियाणे निविष्ठा प्राप्त | **फळझाडाचे नांव** | **संख्या** | **भाजीपाला पिकाचे नांव** | **निविष्ठा वाटप ग्रॅम** |
| | | चिकू | | मेथी | |
| | | का. लिंबू | | पालक | |
| | | पेरु | | लाल भोपळा | |
| | | पपई | | दुधीभोपळा | |
| | | शेवगा | | भाजीपाला जसे दोडका, गवार, वांगी इतर | |
| | | कडीपत्ता | | | |
| | | आळू | | | |
| | | **एकूण** | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | प्राप्त अवजार संच | **अवजाराचे नांव** | **संख्या** | | |
| | | १ फावडे | | | |
| | | २ टिकाव | | | |
| | | ३ .कुदळ व फावडे | | | |

## तक्ता क्रमांक-३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लाभार्थीने लाभ घेतलेले वर्ष | | | | | | | |
| २ | लाभार्थीस मिळालेले उत्पादन | | | | | | | |
| | **फळपिके** | | | | **भाजीपाला** | | | |
| | **फळपिकाचे नांव** | **उत्पादन (किलो)** | | | **भाजीपाला पिकाचे नांव** | **उत्पादन (किलो)** | | |
| | | स्वतः वापर | विक्री | एकूण | | स्वतः वापर | विक्री. | एकूण |
| १ | चिकू | | | | १) मेथी, | | | |
| २ | का. लिंबू | | | | २) पालक | | | |
| ३ | पेरु | | | | ३) शेवगा, | | | |
| ४ | पपई | | | | ४) कढीपत्ता | | | |
| | | | | | ५) आळू | | | |
| | | | | | ६) लाल भोपळा | | | |
| | | | | | ७) दुधी भोपळा | | | |
| | | | | | ८) भाजीपाला जसे दोडका, गवार, वांगी व इतर | | | |
| | **एकूण** | | | | **एकूण** | | | |

## तक्ता क्रमांक-४

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेबाबत लाभार्थीचे अभिप्राय | |
| २ | प्रगणकाचे अभिप्राय | |
| ३ | प्रगणकाचे नांव<br>प्रगणकाची सही | हुद्दा |

## गोषवारा पत्रक

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुका | लाभार्थी संख्या | यशस्वी लाभार्थी संख्या | अयशस्वी लाभार्थी संख्या | पुरविण्यात आलेल्या कलमा / रोपांची संख्या | पुरविण्यात आलेल्या निविष्ठा / किलो ग्रॅम | पुरविण्यात आलेले अवजार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

**११. आहरण व संवितरण अधिकारी-**

या कार्यक्रमासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनां जिल्हास्तरावर आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करणेत येत आहे.

**१२. अनुदान लेखाशिर्ष**

या योजनेतंर्गत होणारा खर्च रु. २०.०० लाख (अक्षरी रु. वीस लाख फक्त) सन २०१६-१७ या वर्षाकरिता मंजूर व अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीनुसार खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

**मागणी क्र. डी-३, २४०१ - पीक संवर्धन**
**११९ बागायती व भाजीपाला पिके**
**(०१) (२७) आदिवासी जिल्हयात परसबाग योजना**
**(२४०१ ३६५४) ३३ अर्थसहाय्य**

**१३. मंजूर कार्यक्रम-**

या योजनेतंर्गत राबवावयाच्या जिल्हा निहाय कार्यक्रमाचे प्रपत्र-१ सोबत सहपत्रित करणेत येत आहे. तसेच आदिवासी जिल्हयामधील तालुक्यांची यादी प्रपत्र-२ मध्ये सहपत्रित करणेत येत आहे. त्याप्रमाणे योजना राबविणेबाबत तात्काळ कार्यवाही करणेत यावी.

**प्रपत्र-१**

**आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना**
**सन २०१६-१७ मधील मंजूर कार्यक्रम**

| अ.क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | खर्च प्रमाणक | एकूण लागणारी आर्थिक तरतूद(रु लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ४०० | रु. २५०/- प्रमाणे प्रति लाभार्थी खर्च | १.०० |
| २ | पालघर | ८०० | | २.०० |
| ३ | पुणे | ४०० | | १.०० |
| ४ | अहमदनगर | ८०० | | २.०० |
| ५ | नाशिक | १६०० | | ४.०० |
| ६ | धुळे | ६०० | | १.५० |
| ७ | नंदुरबार | ८०० | | २.०० |
| ८ | जळगांव | २०० | | ०.५० |
| ९ | नांदेड | ४०० | | १.०० |
| १० | अमरावती | २४० | | ०.६० |
| ११ | यवतमाळ | ८०० | | २.०० |
| १२ | चंद्रपूर | ४०० | | १.०० |
| १३ | गडचिरोली | ५६० | | १.४० |
| | **एकूण** | **८०००** | | **२०.००** |

## प्रपत्र-२

## आदिवासी उपायोजनेअंतर्गत जिल्हानिहाय तालुक्यांची माहिती

| अ.क्र | जिल्हा | उपाययोजनेतंर्गत समाविष्ट तालुके |
|---|---|---|
| १ | ठाणे | १) शहापूर<br>२) भिवंडी<br>३) मुरबाड |
| २ | पालघर | १) डहाणू<br>२) तलासरी<br>३) पालधर<br>४) वसई<br>५) मोखाडा<br>६) जव्हार<br>७) वाडा |
| ३ | पुणे | १) जुन्नर<br>२) आंबेगाव |
| ४ | नाशिक | १) कळवण<br>२) सुरगाणा<br>३) बागलाण<br>४) पेठ<br>५) दिंडोरी<br>६) इगतपुरी<br>७) नाशिक<br>८) त्र्यंबकेश्वर |
| ५ | धुळे | १) साक्री<br>२) शिरपूर |
| ६ | नंदुरबार | १) तळोदा<br>२) अक्राणी (धडगांव)<br>३) अक्कलकुवा<br>४) नवापूर<br>५) शहादा<br>६) नंदुरबार |
| ७ | जळगांव | १) चोपडा<br>२) यावल<br>३) रावेर |
| ८ | अहमदनगर | अकोले |
| ९ | नांदेड | किनवट |
| १० | यवतमाळ | १) मारेगाव<br>२) यवतमाळ<br>३) बाभुळगाव<br>४) कळंब<br>५) राळेगांव<br>६) केळापूर<br>७) घटंजी<br>८) पुसद<br>९) महागाव<br>१०) उमरखेड |
| ११ | गडचिरोली | १) सिरोंचा |

| अ.क्र | जिल्हा | उपाययोजनेतंर्गत समाविष्ट तालुके |
|---|---|---|
| | | २) अहेरी<br>३) एटापल्ली<br>४) धानोरा<br>५) कुरखेडा<br>६) गडचिरोली<br>७) आरमोरी<br>८) चार्मोशी |
| १२ | चंद्रपूर | १) राजूरा<br>२) गोदपिंपरी<br>३) मूळ<br>४) चंद्रपूर<br>५) नागभिड<br>६) शिदेवाही<br>७) ब्रम्हपुरी<br>८) चिमूर<br>९) वरोरा<br>१०) भद्रावती |
| १३ | अमरावती | १) धारणी<br>२) चिखलदरा |

**टिप :** उपरोक्त तालुक्याव्यतिरिक्त नवीन तालुक्यांचा आदिवासी विभागामार्फत समावेश झालेला असल्यास त्या तालुक्यामध्येही ही योजना राबविण्यात यावी.

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११ ००५